प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू, जि. पालघर
जनार्दन आर्केड, डहाणू रोड, ता. डहाणू, जि. पालघर.
पिन कोड - ४०१६०२.
Email ID :poitdp.dahanu-mh@gov.in,

जा.क्र. नियो - २०२३ /प्र.क्र. /का.५ / दिनांक- /०६/२०२३

# जाहीर आवाहन

मा.राज्यपाल महोदय, यांची अधिसुचना क्र. RB/TC/e-१३०१६(१)(२०१९)/Sch Area recruitments/१५६- दिनांक २९ ऑगस्ट,२०१९ अन्वये अनुसूचित क्षेत्रातील १७ संवर्गातील सरळसेवेची पदे भरणेबाबत अध्यादेश निर्गमित केले आहेत. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. आविवि-२०२३/प्र.क्र.१३२/का.१४ दि.१६ जून,२०२३ अन्वये अनुसूचित क्षेत्रातील सरळसेवेची पद भरतीसाठी अर्ज दाखल करणाऱ्या अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) रहिवाशी दाखला हा संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांनी विहीत मुदतीत उमेदवारांना उपलब्ध करून देणेबाबत सुचना प्राप्त झाल्या आहेत.

पेसा दाखला मिळणेकरीता खाली नमुद कलेप्रमाणे आवश्यक कागदपत्रे सादर करण्यात यावीत.

१. अर्जदाराचा विनंती अर्ज
२. तहसिलदार यांचेकडील अधिवास प्रमाणपत्र (Domicile)
३. शाळा सोडल्याचा दाखला
४. जातीचा दाखला
५. आधार कार्ड
६. स्वयंघोषणा पत्र (प्रमाणपत्राचा नमुना सोबत जोडला आहे.)
७. अर्जदार राहत असलेला पाडा/गाव हे पेसा क्षेत्रात येत असल्याबाबतचे महसुल ग्रामपंचायतीचे ग्रामसेवकाचे प्रमाणपत्र (प्रमाणपत्राचा नमुना खालीलप्रमाणे.)

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री.______________ हे _________(पाडयाचे/गावाचे नाव) येथील रहिवासी असून, अर्जदार श्री.________________यांचे आई-वडील/आजी-आजोबा हे २६ जानेवारी १९५० पासून आजतागायत संबंधित पाडयाचे/गावाचे/पालघर जिल्ह्याच्या अनुसूचित क्षेत्रात सतत वास्तव्य करीत आहेत.

_______________________(पाडयाचे/गावाचे नाव) हे________या महसुल ग्रामपंचायत अंतर्गत येत असून सदर ग्रामपंचायत ही पेसा क्षेत्रात येते तरी सदर दाखला हा खात्रीपुर्वक देण्यात येत आहे.

ग्रामसेवक स्वाक्षरी व शिक्का

(संजीता महापात्र, भा.प्र.से.)
सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
डहाणू, जि. पालघर

अर्जदाराचा फोटो

स्वयंघोषणापत्र

मी कु./श्री./कुमा./श्रीम.______________श्री./श्रीम.__________________ यांचा मुलगा/मुलगी वय____वर्ष, राहणार________________(गाव/पाडा/महसुल ग्रामपंचायतचे नाव नमुद करावे) येथील नियमित रहीवाशी असून, माझे आई-वडील/आजी-आजोबा हे २६ जानेवारी १९५० पासून आजतागायत संबंधित पाडयाचे/गावाचे/पालघर जिल्ह्याच्या अनुसूचित क्षेत्रात सतत वास्तव्य करीत आहेत.

सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये/संबंधित कायाद्यानुसार माझ्यावर खटला दाखल केला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन. तसेच सदर स्वयंघोषणापत्राव्दारे मला मिळालेले सर्व लाभ सर्वकषरित्या काढून घेण्यात येतील याची मला पूर्णपणे जाणीव आहे.

ठिकाण______________ अर्जदाराची सही_______________

दिनांक______________ अर्जदाराचे नांव________________